# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड    जा. क्र.  75/2024        दिनांक : 24.02.2024**

## 1)घरफोडी :–

**सिंदखेड :–** दिनांक 21.02.2024 रोजी चे 21.00 ते दिनांक 22.02.2024 रोजी 07.00 वा. चे दरम्यान, **मौ. सारखणी येथे फिर्यादीचे गोडावुन मधुन ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीने शेतातील तुर आणुन गोडावुन मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयांनी गोडावुनचे शटर काढुन आत प्रवेश करून दोन क्विंटल तुर किंमती 16,000/–रू ची कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेली आहे. वगैरे **फिर्यादी फैसल हारूण फाजलानी, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. सारखणी ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 16/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2106 पठाण, मो. नं. 9309574775** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**हदगांव :–** दिनांक 23.02.2024 रोजी चे 14.00 ते 15.00 वा. चे दरम्यान, **वारंगा फाटा ते हदगांव एसटी बस मध्ये प्रवासादरम्यान ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई ही तिचे भावाचे मुलीचे लग्ना करिता हदगाव येथे एसटी बसने येत असतांना त्यांचे जवळील कापडी पिशवीत ठेवलेले सोन्याचे दागीने किंमती अंदाजे 85,000/–रू चे वारंगा फाटा ते हदगाव प्रवासादरम्यान कोणीतरी अज्ञात महिलां आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी कौसाबाई भगवानराव व्हिटकर, वय 65 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कनेरगाव नाका ता. जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 48/2024 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/35 चिंतले, मो.नं. 9284056205** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 22.02.2024 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **सपना बारच्या बाजुस असलेल्या हॉटेल समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीएम–5137 किंमती 35,000/– रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी गोविंद शंकर पल्लेवाड, वय 49 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. ज्ञानेश्वर नगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 89/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1774 एमेकर, मो. क्रं. 9767128894** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**कंधार :–** दिनांक 01.05.2016 ते दिनांक 16.12.2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासर नवरंगपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन शेतात पाईपलाईन करण्यासाठी व मोटार सायकल खरेदी करण्यासाठी तीन लाख रूपयांची मागणी करून शारिरीक व माणसीक त्रास देऊन शिवीगाळ करून थापडा बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 54/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप , मो.क्रं. 9421849989** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**1)उमरी :–** दिनांक 22.02.2024 चे सायंकाळी 19.00 वा. चे सुमारास, **उमरी ते कारेगाव फाटा जाणारे रोडवर धर्मा गुरूजी यांचे नर्सरी समोर गोळेगाव शिवार ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सदानंद अमृता कांबळे, वय 35 वर्षे, रा. पिंपळगाव ता. बिलोली जि. नांदेड** यास यातील नमुद ट्रेलर क्रमांक एमएच–20/ईजी–1823 च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणाणे भरधाव वेगात चालवुन रोडच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून मयातचे मोटार सायकल क्रमांक एमएच–16/एडब्ल्यु–4094 हीस धडक देऊन गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी पुंडलीक अमृता कांबळे, वय 51 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पिंपळगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं. 81/2024 कलम 279, 304(अ), भादवी सह कलम 184, 185, ए बी मो वा का कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चेवले, मो.क्र. 8600303335** हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :–** दिनांक 22.02.2024 चे पाहाटे 04.30 वा. चे सुमारास, **नांदेड ते देगलुर जाणारे रोडवर मौ. केरूर घाटात ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुनिल रामप्रसाद कुमार, वय 28 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. सकरा पोस्ट देवकली मंडळ इलाहाबाद जि. प्रतापगड राज्य उत्तरप्रदेश** यांनी आपले ताब्यातील कंटेनर क्रमांक जीजे–06/बीव्ही–2818 मध्ये गॅस भरून कंटेनर हैद्राबादकडे जात असतांना त्यांनी त्यांचे ताब्यातील कंटेनर भरधाव वेगात हयगय व निष्काळजीपणे चालवुन पलटी केल्याने त्याचे डोक्यात पाठीमागील बाजुस गंभीर मार लागुन रक्त निघाले व त्याचे पोटात, छातीत व ईतर ठिकाणी मार लागुन तो जागीच मरण पावला. स्वताचे मरणास स्वता कारणीभुत झाला. व कंटेनरचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. वगैरे **फिर्यादी मनोज सिताराम कुमार, वय 38 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सकरा पोस्ट देवकाली मंडळ इलाहाबाद जि. प्रतापगड राज्य उत्तर प्रदेश** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं. 46/2024 कलम 279, 304(अ), 427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री नरवडे, मो.क्र. 9850813661** हे करीत आहेत.

# 6)फसवणुक :–

**मरखेल** :– सन 2021 ते 2023 दरम्यान, **मौ. शिळवणी ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून जागेचे खोटे कागदपत्र व शपथपत्र तयार करून नमुना नंबर आठचा उतारा तयार करून त्या आधारे रस्त्याची जागा हडप करून शासनाची फसवणुक केली. वगैरे वरून मा. न्यायालयाचे आदेशावरून 156(3) सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला. वगैरे **फिर्यादी बालाजी गंगाराम घोळेकर, वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. शिळवणी ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं. 32/2024 कलम 420, 464, 467, 468, 471, 120(ब) भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री संकेत दिघे, मो.नं. 9834255985** हे करीत आहेत.

# 7)भारतीय हत्यार कायदा :–

**इतवारा :–**दिनांक 23.02.2024 रोजी चे 01.05 वा. चे सुमारास, **पहेलवान टी हाऊसच्या समोरील रोडवर भिंतीच्या आडोशास नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने स्वताचे अस्तीत्व लपऊन पहेलवान टी हाऊसच्या भिंतीच्या आडोशाला दबा धरून बसलेल्याने त्याचे हालचाली संशयास्पद असल्याचे चौकशी करून अंगझडती घेतली असता त्याचे जवळील नकली अग्नीशस्त्र बेकायदेशिररीत्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री रहिम बशीर चौधरी**, ने. **पोस्टे इतवारा नांदेड** ,यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 53/2024 कलम 6/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/436 मोकले. मो.क्रं. 9423669795** हे करीत आहेत.

# 8)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 23.02.2024 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **संभाजी शिंदे यांचे दुकाना समोर मौ. कलंबर दे. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटटीची गावठी दारू किंमती 3500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2000 गुनाजी मारोती सुरनर, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबद** गुरनं 37/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2068 कागणे, मो.नं. 9823156052** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद :–** दिनांक 23.02.2024 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, आरोपीचे घरी मौ. गोजेगाव ता. मुखेड **जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटटीची गावठी दारू किंमती 1500/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2068 माधव लक्ष्मणराव कागणे, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबद** गुरनं 38/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2000 सुरनर, मो.नं. 9823156052** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र.   76/2023          दिनांक : 24.02.2024**

पोलीस अधीक्षक कार्यालयात " **संत रविदास महाराज**" यांची जयंती साजरी

23 फेब्रुवारी, 2024 शुक्रवार रोजी **"संत रविदास महाराज "** या महापुरूषांची जयंती पोलीस अधीक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार मोठया संख्येने उपस्थित राहुन **"संत रविदास महाराज"** या महापुरूषास अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/सुर्यभान कागणे, पोहेकॉ/संजय सांगवीकर, पोकॉ/मारोती कांबळे, विनोद भंडारे** यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

